## मित्र

असावा असा एक सच्चा मित्र
आनंदाचे क्षण शेअर करायला
आणि कधीतरी -
मनातली भळाळती जखम
मोकळी करायला -
काहीच अपेक्षा न बाळगणारा
पण मनापासून दाद देणारा
कौतुक करताना
शब्दातून वाहणारा
असावा असा एक सच्चा मित्र!
नाही आवडलं, स्पष्ट सांगणारा
हरभऱ्याच्या झाडावर
उगीच न चढवणारा
लांब राहूनही -
काळजी घे म्हणणारा
अन् माझ्या काळजीने
स्वतः खंतावणारा -
असावा असा एक सच्चा मित्र
भेटला - नाही भेटला
तरी कायम मनांत असलेला
यू डिझर्व इट म्हणताना
बरंच काही सुचवणारा -
डोळ्यात डोळे घालून
नाही बघणार तो -
फोन करेल, मेसेज करेल
म्हणेल तुझा हक्कच आहे
हे मिळण्याचा, मिळवण्याचा
छान वाटलं ऐकून
कळवलंस म्हणून

'आपल्या' माणसाचं कौतुक
करायलाच हवं -
असं म्हणण्यासाठी तरी
असायलाच हवा एक सच्चा मित्र
मग मनापासून वाटतं
नाही मिळाला एखादा पुरस्कार
तरी चालेल, पण -
खरी खरी दाद मिळण्यासाठी
असावा असा एक सच्चा मित्र!
कारण तो असेल जणू आरसा
माझ्याच मनाचा, नीतळसा -
दाखवेल माझंच प्रतिबिंब
नाही म्हणणार, सुंदर दिसतेस
पण जाणीव करून देईल
मी सुंदरच आहे -
क्वचित देणारही नाही प्रतिक्रिया
घेईल फक्त ऐकून, त्यासाठी तरी
असावा  असा एक सच्चा मित्र!
एकटेपणाची जाणीव पुसणारा
सामर्थ्याची आठवण देणारा
खूप जवळचा, तरीही तटस्थ
'तो' आणि 'ती' च्या पलीकडचं
मनाचं नातं जपणारा -
असावा असा एक सच्चा मित्र
असावा असा एक सच्चा मित्र !

**लीना माटे**